# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक १९/०२/२०२२ (शनिवार)**

**(दुपार)**

---

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. उमरेड –** दिनांक ११/०२/२०२२ चे ११.०० वा. चे सुमारास पो.स्टे. उमरेड हद्दीत फिर्यादीयांची १७ वर्ष ९ महिने अल्पवयीन मुलगी हीला आरोपी नामे– रूषी लहू शिंदे, रा. मकरधोकडा उमरेड जि. नागपूर याने तिला लग्नाचे आमिष दाखवून फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि शितल खोब्रागडे या मो.क्र. ८३०८०८२०९४ या करीत आहे.

### अपघातात मृत्यु

**पो.स्टे. कुही** :– अंतर्गत २२ कि.मी. अंतरावरील मौजा कुही फाटा येथे दिनांक १२/०२/२२ चे ०९.३० वा. दरम्यान एमएच– ४०/झेड– ०८०४ क्रमांकाच्या मोटरसायकलचा चालक आरोपी नामे– भाउदास जयपाल गजभिये (मृतक), वय ६२ वर्ष, रा. बाजार चौक, पाचगाव ता.उमरेड जि.नागपुर याने आपली मोटरसायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन कुही फाट्याजवळ त्याच्या गाडीचा नियंत्रण बिघडुन गाडी स्लीप होवुन डिवायडरला धडकल्याने चालक खाली पडुन जखमी झाला. त्यास उपचाराकामी पाचगाव येथील रूग्णालय येथे नेले असता डॉक्टरांनी मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी सरतर्फे पोहवा चांगदेव कुथे पोस्टे कुही यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३८, ३०४ (अ) भादवी १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री चंद्रकांत मदने मो.नं. ९९२२४३६१९५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**